# रसक्रिया-अवलेह कल्पना

प्रो.डॉ. कल्याणी कुंजन जाधव

विभागप्रमुख - रसशास्त्र भैषज्यकल्पना

सुमतीभाई शाह आयुर्वेद कॉलेज हडपसर

# रसक्रियेची आवश्यकता

- स्वरस, क्वाथ, हिम, फांट यांचा सविर्यतावधि कमी असतो, त्यामुळे औषधींच्या टिकाऊपणाच्या हेतुने
- मात्रा अल्प
- रुग्णाच्या दृष्टीने घेण्यास सुकर
- प्रायः मधुर रसात्मक

# रसक्रिया

- व्याख्या:

क्वाथादिनां पुनः पाकात् घनत्वं सा रसक्रिया ।
सोऽवलेहो लेहश्च तस्य मात्रा पलोन्मिता ॥ शा. स. म. ख 8/1

- रसक्रिया व अवलेह हे एकमेकांचे पर्यायी शब्द म्हणून ग्रंथात आले आहेत
- क्वाथ आदि म्हणल असलं तरी प्रत्यक्षात केवळ क्वाथापासूनच रसक्रिया व अवलेह बनवला जातो.

# रसक्रियेचे प्रकार

- 1) फाणित
- इक्षो रसस्तु यः पक्वः किंचित् गाढो बहुद्रवः ।
  स एव इक्षुविकारेषु ख्यातः फाणितसंज्ञया ॥ भा. प्र. पू
- प्रवाहि असतो.

- 2) अवलेह:
- हा प्रकार अर्धप्रवाही असतो. उदा. वासावलेह, च्यवन्प्राश अवलेह

- 3) घन:
- हा प्रकार पुर्णपणे घन अवस्थेत असतो. उदा. गुडुचि घन, यष्टिमधु घन

# रसक्रिया बनवण्याची कृती

1. क्वाथ निर्माण
2. पाक प्रक्रिया
3. शुष्किकरण

- घनसार:

1. केवळ क्वाथापासून निर्मित
2. चूर्ण आणि क्वाथापासून निर्मित

रसक्रिया/ घनसार उदाहरणे:

1) रसांजन:

दार्वीक्वाथसमं क्षीरं पादं पक्ता यदा घनम् ।
तदा रसांजनं ज्ञेयं तन्नेत्रयोः परमं हितम् ॥ भा. प्र हरी 203

घटकद्रव्य:

1. दारुहरिद्रा क्वाथ 4 भाग
2. क्षीर/ अजाक्षीर(आ.प्र) 1 भाग

प्रक्रिया:

दार्वी क्वाथ निर्माण
घनसार निर्माण

1. गुडुचि घन

- घटकद्रव्य:

1. गुडुचि भरड 1 भाग
2. जल 8/16 भाग
3. गुडुचि चूर्ण

- निर्माण विधि:

1. गुडुचि क्वाथ निर्माण
2. भावना

- उपयोग: ज्वरघ्न, रक्तपित्तघ्न, रसायन

- मात्रा: 2-8 गुंजा

# अवलेह कल्पना

- शब्द निरुक्ति:
- लिह् आस्वादने
- चाटून खाण्यास योग्य

- कल्पना निर्मितिचे कारण:
- रसक्रियेच्या टिकाऊपणातील मर्यादा
- मधुर द्रव्य एकत्रीकरणातून येणारे गुणविशेष

- व्याख्या:

क्वाथादिनां पुनः पाकात् घनत्वं सा रसक्रिया ।
सोऽवलेहो लेहश्च तस्य मात्रा पलोन्मिता ॥ शा. स. म. ख 8/1

# सामान्य घटक द्रव्ये- प्रमाण

- सामान्य घटक द्रव्ये:

1. द्रवपदार्थ
2. मधुर द्रव्य
3. मधु
4. प्रक्षेप द्रव्य

- अवलेहातील घटकद्रव्यांचे प्रमाण:
- सिता चतुर्गुणा कार्या चूर्णाश्च द्विगुणो गुडः ।
  द्रवं चतुर्गुणं दद्यात् इति सर्वत्र निश्चयः ॥ शा. स. म. ख 8/2
- चूर्ण 1 भाग
- शर्कर 4 भाग
- गुड 2 भाग
- द्रव 4 भाग

# निर्माण विधि-पाकाचे प्रकार

1. घटक द्रव्यांपासून द्रवद्रव्य निर्माण करणे
2. द्रवद्रव्य आणि मधुर द्रव्य एकत्र करावीत
3. अग्निच्या सहाय्याने पाकप्रक्रिया करणे
4. पाक सिद्धि लक्षणे
5. पाकसिद्धिनंतर अग्निची प्रक्रिया बंद करुन त्यामधे प्रक्षेप द्रव्य एकत्रिकरण
6. मिश्रण स्वांगशीत झाल्यानंतर त्यामधे मधु एकत्रिकरण करणे

- पाकाचे प्रकार:

1. बिन्दु पाक
2. तन्तु पाक

# <u>अवलेह सिद्धि लक्षणे</u>

- सुपक्वे तन्तुमत्वं स्यात् अवलेहोऽप्सु मज्जति ।
  खरत्वं पीडिते मुद्रा गन्धवर्णरसोद्भवः ॥ शा. स. म. ख 8/3

- सुपक्वे
- तन्तुमत्वं
- अप्सु मज्जति
- खरत्व पीडिते मुद्रा
- गन्धवर्णरसोद्भवः

मात्रा:

1. 1 पल(आचार्य चरक)
2. 1 कर्ष(आचार्य यादवजी त्रिकमजी)

अनुपान:

दुग्धं इक्षुरसो युषः पंचमूलिककषायजम् ।
वासाक्वाथो यथा योग्यम् अनुपानं प्रशस्यते ॥शा. स. म. खं 8/4

# Modern parameters

- Loss on drying
- pH
- Ash value
- Loss on drying at 105°c •
- Acid insoluble ash
- Specific gravity
- Total solid contents
- Fat contents
- Heavy metal tests
- Reducing sugar
- Microbial count
- Chromatography
- Total sugar

# वासावलेह

अधिकार: राजयक्ष्मा

वासकस्य रसः प्रस्थं मानिकाः सितशर्करा ।
पिप्पली द्विपलं तत्र सर्पिषश्च शनैः पचेत् ॥
तस्मिन् लेहत्वमायाते शीतेक्षौद्रे पलाष्टकम् ।

भा. प्र राजयक्ष्मा

- घटकद्रव्य

1. वासा स्वरस 1 प्रस्थ 640 ml
2. शर्करा 1 मानिका 320 gms
3. पिप्पली 2 पल 80 gms
4. गोघृत 2 पल 80 gms
5. मधु 8 पल 320 gms

# निर्माण विधि

- पिप्पली चूर्णाचे गोघृतामध्ये भर्जन करुन घ्यावे.

1. वासा स्वरस आणि शर्करा एकत्र करुन त्याचा पाक करुन घ्यावा.
2. पाक सिद्धि लक्षणे दिसल्यानंतर गोघृतामध्ये भर्जन केलेले पिप्पली चूर्ण त्यामध्ये एकत्र करावे.
3. मिश्रण स्वांगशीत झाल्यावर त्यामध्ये मधु एकत्र करवा.

- मात्रा: 1 कर्ष

- रोगघ्नता:
- श्वास, कास, राजयक्ष्मा, पार्श्वशूल, रक्तपित्त, ज्वर

- अनुपान:
- कोष्ण जल, दुग्ध

# च्यवनप्राश अवलेह

## अधिकार: रसायन

- घटकद्रव्ये:
- क्वाथ घटकद्रव्ये:

1. दशमूल
2. बृंहण द्रव्य: अष्टवर्ग, बला, पुनर्नवा, अमृता, काकनासिका, विदारीकन्द
3. प्राणवह स्रोतसावर कार्यकारी द्रव्य: वासा, अगुरु, शृंगी, शठी, पुष्करमूल, तामलकी, द्राक्षा, पिप्पली
4. शीतवीर्य द्रव्य: चंदन, उत्पल, मुस्ता
5. अनुलोमन: हरीतकी

- प्रत्येकी 1 पल
- द्रवद्रव्य: जल 1 द्रोण(12.5 लिटर)
- क्वाथ: 1/4 द्रोण(6.225 लिटर)

1. आमलकी फल 500 नग

2. स्नेह द्रव्य:

घृत 6 पल 240 gms

तैल 6 पल

1. मधुर द्रव्य:

शर्करा अर्धा तुला (2.250 किलो)

मधु 6 पल (240 ग्रॅम्स)

1. प्रक्षेप:

वंशलोचन 4 पल (160 ग्रॅम्स)

पिप्पली 2 पल (80 ग्रॅम्स)

त्रिजात 3 पल (120 ग्रॅ)

# निर्माण विधि

1. क्वाथ निर्माण
2. आमलकी फलांचे क्वाथामध्ये पाचन
3. आमलकी फल निष्कुलीकरण
4. आमलकी फलांचे स्नेह द्रव्यांमधे पाचन
5. क्वाथापासुन पाक निर्मिति
6. पाचित आमलकी फल आणि पाकाचे एकत्रिकरण
7. अवलेह सिद्धि लक्षणे
8. प्रक्षेप एकत्रिकरण
9. मधु एकत्रिकरण

रोगघ्नता:
रसायन, उरःक्षत, स्वरक्षय

मात्रा: 1 कर्ष

अनुपान: गोदूग्ध